# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष

## प्रकरण पाचवे

## निष्कर्ष

मानवी समूहाचे अंतरंग समजून घेण्यास साहित्या सारखे दुसरे प्रभावी साधन नाही· साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे· जे मानवी जीवनात आहे तेच साहित्यात असते व जे साहित्यात असते तेच मानवी जीवनात पहावयास मिळते असा आजपर्यंतचा अनुभव आहे· साहित्य हे जीवनापासून दूर राहूच शकत नाही आणि राहू नये ही सर्वांची अपेक्षा असते· वास्तव जीवन दर्शन घडविणा-या वाङ्मय प्रकारामध्ये दलित आत्मचरित्रांचा सर्वप्रथम विचार करावा लागेल· वर्षानुवर्ष अनुभवलेल्या उपेक्षित जीवनाचे व जीवन पध्दतीचे रूप दलित साहित्यात उमटणे स्वाभाविक आहे·

ग्रामीण साहित्य निर्मितीत दलित साहित्याचा एक नवा प्रवाह येवून मिसळला व त्यामुळे बलुतेदारांच्या जीवनाचा मागोवा घेण्याचा एक नवा प्रवाह दलित वाङ्मयामुळे मराठी साहित्यात प्रवाहित झाला· इ·स· 1960 पासून दलित साहित्याची निर्मिती झालेली असून या साहित्याची प्रेरणा डॉ·बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व तत्वज्ञान हे आहे· आत्मचरित्र हे आत्मकथन असून आपल्या बद्दल सांगण्याच्या उत्कट प्रवृत्तीतून या लेखनाचा जन्म झाला आहे· आधुनिक मराठीतील आत्मचरित्राला दीड शतकाची परंपरा असली तरी दलित आत्मकथनपर लेखन हे अलिकडच्या काळातील आहे· साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून आपल्याच जीवनाचे दर्शन घडवावे या डॉ·बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याकडे पहाण्याच्या दृष्टीकोनाप्रमाणे दलित साहित्याकडे पाहिले तर दलित साहित्याचे स्वरूप याची प्रचिती आणून देते· अर्थपूर्ण व वास्तव जीवनानुभव अशी साहित्याची व्याख्या केली तर त्याची आशयगर्भता दलित आत्मकथनामध्ये अधिक स्पष्ट होते· व्यक्तिगत अनुभवाबरोबर समाज स्थिती आहे कशी व असावी कशी हे पडताळून पहाण्याचे आत्मकथनाससारखे दुसरे साधन नाही· आत्मकथनातून हे व्यक्तिमनाचे

जसे दर्शन घडते तसेच समाज मनाचे दर्शनही घडते त्या व्यक्ति बरोबरच तो समाज समूहच बोलत आहे असे लक्षात येते· व्यक्तिमनाचे कडं जसे अभिव्यक्त होतात त्याच बरोबर समाजाची सुख दुःखे, आशा आकांक्षा, ताण-तणाव, यांचे व्यापक रूपही त्यातून व्यक्त होते· एकंदरीत भारतीय समाज व्यवस्थेच्या तळाशी रुजलेल्या घातक जातिभेदांचे अंधश्रध्दांचे, अज्ञानाचे प्रत्ययकारी दर्शन ही त्यातून घडते· व्यक्ति जीवनाच्या कथेबरोबर समूह मनाची कथाही व्यक्त होते· ही गोष्ट येथे विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखे आहे· यावरून आत्मकथन हे व्यक्तिमनाबरोबरच समूह मनाचा चालता बोलता व ज्वलंत आविष्कार आहे हेच येथे सिध्द होते· तसेच मानवी जीवन मूल्यावर आणि सांस्कृतिक जीवनमूल्यावर त्यातून भेदक प्रकाश पडतो हे ही खरे·

दलित साहित्याचा जन्म दुःखातून झालेला आहे हे निर्विवाद सत्य लक्षात घेतले तर आपले दाहक अनुभव, आपल्या व्यथा, वेदना, दुःख, मनाचे आक्रंदन, दलित कवी किसन फागू, शाहीर घोंडगे, वामन कडवे, नारायण सुर्वे, ज·वि· पवार, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळा, प्रल्हाद चेंदवणकर, यांच्या कवितेतून प्रगट झाला आहे· तर दलित कथाकारांनी आपल्या कथनातून अस्पृश्य म्हणून समाजानी केलेली उपेक्षा, अवहेलना, अमानुष छळ, असे कितीतरी दुःखे आपल्या कथेतून मांडलेले आहे· याचे श्रेय अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, दया पवार, केशव मेश्राम, आदी लेखकांना द्यावे लागेल· यापैकी काही लेखकांनी कादंबरी लेखन करून दलितांच्या दुःखाचे दर्शन कादंबरी वाङ्मय प्रकारातून व नाटय वाङ्मयातून घडवून दलितांच्या दुःखांना दृक् व श्राव्य स्वरूपात चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे· दलित कथा, कविता व कादंबरी नाटक वाङ्मय प्रकारातून या साहित्यकांनी सत्याच्या वास्तवावर कल्पनेची दुनिया उभारून या सर्व प्रकारच्या वाङ्मयातून संताप, चीड, प्रक्षोभ, मनस्ताप, बंडखोरीची वृत्ती प्रगट करून नव समाज निर्माण करण्याची जिद्द प्रगट केली आहे· आपल्या साहित्यातून विद्रोह, उद्रेक व नकार व्यक्त करताना त्यातून तत्वचिंतन, विद्या व्यासंग, तंत्र साधन व भाषा प्रभुत्व घडावे अशी रास्त अपेक्षा आहे· पुढील काळात दलित साहित्याच्या वाटचालीत जीवनात प्रत्यक्ष भोगलेले क्षण, झेलले प्रसंग आणि भेटलेली माणस यांचे जसे आहे तसे चित्रण करण्याकडे प्रवृत्ती वाढत गेली व

आत्मकथन, आत्मचरित्रे, आत्मकथा या नव्या आकृतीबंधात दलित साहित्याची निर्मिती होत गेलेली आहे. या संदर्भात दया पवाराचं "बलुतं", माधव कोंडविलकरांचे "मु.पो. देवाचे गोठणे", लक्ष्मण माने यांचे "उपरा", प्र.ई. सोनकांबळे यांचे "आठवणींचे पक्षी", शंकरराव खरातांचे "तराळ अंतराळ", राम नगरकरांचे "रामनगरी" दादासाहेब मोरे यांचे "गबाळ", शरणकुमार लिंबाळे यांचे "अक्करमाशी" रूस्तुम अचलखांब यांचे "गावकी", उत्तम बंडू तुपेंचे "काटयावरी पोटं", डॉ.भीमराव गस्ती यांचे "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्रांनी याची प्रचिती आणून दिलेली आहे व या सर्व लेखकांनी आपण व आपल्या समाजानी भोगलेल्या दुःखाचे व यातनांचे चित्रण करून दलितांच्या व्यक्तिगत व सर्व समाजाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. या सर्व कवी, कादंबरीकार, नाटककार व आत्मचरित्रकार यांना दलित जीवन व त्यांच्या समस्या व्यक्त करण्यासाठी हे वाड्मय प्रकार उपयुक्त वाटले. त्याचा साधन म्हणून त्यांनी उपयोग केला. मानवी मनाला स्पर्श करण्याचे आत्मचरित्राचे सामर्थ्य व प्राप्त परीस्थितीची गरज लक्षात घेवून समाज जागृतीसाठी विशेषतः दलितांचे प्रश्न मांडण्यासाठी आत्मचरित्र या वाड्मय प्रकाराचा त्यांनी जाणीव पूर्वक विचार केला. त्यामुळे दलितांच्या जीवनाचे दर्शन घडविले व दलित समाजाच्या उपेक्षित जीवनाचा आलेख समाजाच्यापुढे ठेवणे हे येथे स्वाभाविकपणे घडले आहे.

एक प्रकारे सामाजिक प्रबोधनाचीही भूमिकाच त्यांनी स्पष्ट केली आहे. आतापर्यंत उल्लेख केलेल्या या आत्मचरित्रांनी दलित समाजाला जागृत तर केले आहे व प्रस्थापितांनाही अंतर्मुख केले आहे. आत्मचरित्र लेखनाने दलितांची स्थिती सुधारावी व लोकांच्या अभिरूचीला नवीन वळण लागावे हाही प्रयत्न येथे केला आहे. सामाजिक चळवळींचा वाड्मय निर्मितीवर कसा परिणाम होतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे दलित वाड्मयाचे प्रत्यंतर अलिकडच्या काळातील आत्मचरित्र निर्मितीवरून येते. या आत्मचरित्रांनी समूह मनाची जागृती केली. आत्मचरित्रामध्ये दलितांची उपेक्षा, त्यांचा अमानुष छळ , प्रस्थापिताकडून त्यांचे होणारे शोषण, त्यांच्या अंधश्रध्दा, अशी एकमेकाला स्पर्श करणारी अनेक वर्तुळे त्यात आहेत. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्रे व नियतकालिके इत्यादी ग्रंथाव्दारे विचारवंतांनी केलेले प्रबोधन, धर्म सुधारणेच्या चळवळी मते आणि मतभेद दलित व प्रस्थापित यांच्यातील संघर्ष , नवीन झालेले

कायदे, शासनाच्या सवलती अशी नाना वर्तुळे विस्तारत जावून दलित सुधारणाविषयक पर्यावरण महाराष्ट्रात निर्माण झाले· व या वातावरणाचा परिणाम वाङ्मय निर्मितवर झाला· दलित चळवळीत सहभागी झालेल्या सुशिक्षित दलित लेखकांनी आपली लेखणी सामाजिक परिवर्तनासाठी वापरली हेच येथे स्पष्ट होते·

इ·स· 1800 ते 1993 या कालखंडात आतापर्यंत विवेचन केलेल्या आत्मचरित्र पर वाङ्मयाने आपली आत्मचरित्रे लिहून आत्मचरित्रपर वाङ्मय प्रकार समृध्द केला आहे· या कालखंडात अनेक स्त्री पुरुष लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत· अलिकडच्या काळात काही दलित लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहून या वाङ्मयामध्ये मोलाची भर घातली आहे· अलिकडच्या काळातील दलितांच्या उपेक्षेचे स्वरूप, तीव्रता आणि समाज मनातील व लेखकांच्या मनातील जाणिवा यांचा अंदाज या लेखनावरून बांधता येतो· दलित साहित्याने दलितांच्या समस्य कशा तीव्र स्वरूपाच्या आहेत व या समस्यांची तीव्रता दलित चळवळींनी कशी कमी केली आहे हेही येथे दाखवून देण्याचा महत्वाचा प्रयत्न केला आहे· अलिकडच्या काळातील दलित चळवळींच्या सामाजिक संदर्भाशिवाय या आत्मचरित्र लेखनाचे आकलन अपूर्ण रहावे इतका त्यांचा सामाजिक जीवनाशी अतूट संबंध आहे·

इ·स· 1960 ते इ·स· 1993 या कालखंडातील दलित आत्मचरित्रांनी वेगवेगळे अनुभव चित्रित करून वाचकास वेगळ्या जगाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला· इ·स· 1960 नंतर दलित आत्मकथन हा एक नवा वाङ्मय प्रकार मुख्यतः दलित लेखकांनी निर्माण केला· प्रत्यक्ष अनुभवलेल्या अर्थपूर्ण संवेदना, वेदना, दुःख, दारिद्रय, अत्याचार,अन्याय, जातीवाद यांचेच प्रतिपादन यात केलेले असून त्यामुळे हे एक श्रेष्ठ ललित गद्य बनले आहे·

उदा· माधव कोंडविलकरांच्या "मु·पो· देवाचे गोठणे" मध्ये माधवचे व्यक्तिजीवन व्यक्त होत असताना माधवचे दुःख व उपेक्षा त्यांचे मनोधैर्य हे आपणास त्याच्या उपेक्षित जीवनाची भेदक जाणीव करून देते पण त्याच बरोबर सारा समाजच त्याच्या रूपाने बोलत आहे असे आपल्या लक्षात येते·

मिटलेली कवाडे मधील मुक्तासर्वगोड हिने लिहिलेल्या आपल्या स्वतःच्या जीवनाचे पदर हळूवारपणे उकलून दाखविताना तिला सवर्ण वर्गाशी करावा लागलेला संघर्ष किती तीव्र व कसा भेदक स्वरूपाचा होता हे दाखवून दिले आहे. शिकून पुढे आलेली मुक्ता आपल्या कुटुंबाला पुढे आणते आपल्या समाजाची सुधारणा करते. पण सवर्ण समाजाने तिला कसे नाउमेद केले याचे परखड चित्रण वाचकाच्या मनाचा वेध घेते.

अंतःस्फोटमधील कुमूद पावडे आंतरजातीय विवाह करून प्राध्यापिका होते. ती म्हणते त्याच कॉलेजमध्ये आज मी प्राध्यापिका आहे. परंतु शल्यही अजून मनात आहे की, कुमूद सोमकुवरच्या नावाने मिळालेली नोकरी हे तिचे श्रेय नाही तर श्रेय आहे कुमूद पावडेचे. पतीच्या नावाने पत्नीचे नावे आणि तिची जात ही बदलते असे ऐकते आणि म्हणून म्हणते "संस्कृत प्राध्यापिकेचे श्रेय सौ.कुमूद पावडेच्या तथाकथित सवर्णतेला आहे. अजूनही वंचित आहे, तिच्या पूर्वाश्रमीची जात.

"आठवणींचे पक्षी" मधील प्रल्हाद म्हणजेच लेखक स्वतःच, "जातील हेही दिवस" याच आशावादाने जगतो. पण त्याचा हा आशावाद, त्याची स्वप्ने साकार होतील की नाही हेही तो सांगू शकत नाही.

"गावकी" मधील रूस्तूम अचलखांब यांना गाववाल्यांनी गाव कुसाबाहेरच्या अन रानात रहाणा-यांशी कसे युध्द लावून दिले होते याचे चित्र "गावकी" मध्ये रेखाटले आहे.

या सर्व उदाहरणातून एका व्यक्तीचे जीवन आढळत नाही तर सर्व समाजाचे दुःख, आशा आकांक्षा, ताण तणाव अभिव्यक्त झालेले आढळते. व्यक्ती मनाबरोबर भारतीय समाजव्यवस्थेच्या तळाशी साचलेली विषमता, अंधश्रध्दा, जातीभेद, अज्ञान, श्रेष्ठ कनिष्ठता या प्रश्नांचे बधीर झालेल्या अस्पृश्य जातीचे प्रत्ययकारी दर्शन घडते. तराळ अंतराळ मध्ये हेच दुःख म्हणजे पेटते पलित आहे याची जाणीव तराळ अंतराळ मध्ये शंकरराव खरात बोलून दाखविताना परखडपणे म्हणतात " ही माझ्याजीवनाची कथा आहे तर त्याच बरोबरही एक स्टोरी ऑफ दी अनटचेबल आहे." या चर्चेवरून

आज पर्यंत लिहिलेल्या दलित आत्मकथनामध्ये व्यक्तीबरोबर एका समाजाच्या, गावाच्या मानसिक, सामाजिक वैचारिक जीवनाचे दर्शन घडते असेच त्यांनी दाखवून दिले आहे·

आपल्या छळाला आपला समाजही कसा कारणीभूत होतो याचे चित्रणही या आत्मचरित्रातून लेखक करीत असतो· उदा· "बलुतं" मध्ये पहावयास मिळते· लहानपणी पाहिलेल्या व अनुभवलेल्या म्हारकीच्या काळजावरच्या रेघा, भूतकाळ सुध्दा पुसता पुसत नाहीत· चेह-यावरचे लाचारीचे लेप कधीच पुसले जात नाही· रक्त निघे पण ते पुसरणार नाही· याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे· विजय शिरसटांच्या "कुस्ती" मध्ये देखील त्यांनी आपल्या समाजाची व्यंगे परखडपणे आणि निरधोकपणे मांडले आहे· हे एक प्रकारचे वास्तव दर्शन घडविण्याचा प्रकार आहे· सत्य दर्शनाचे असे भेदक चित्र दलित आत्मचरित्रातूनच पहावी· दलित आत्मकथनातून आलेले आत्म परिक्षण म्हणजे सामाजिक वास्तवाचा आरसाच आहे· या सर्व दलित आत्मकथनातून उमटलेल्या प्रादेशिक खुणा स्त्री-पुरूष चित्रणातून व भाषेच्या वेगळेपणातून प्रगट झाले आहे· "गावकी" व "आठवणीचे पक्षी" मधील भाषा मराठवाडयाकडील आहे· त्यात वावरणा-या व्यक्ति ही तिकडच्याच आहेत· उदा· "हकीकत" व "जटायूची" भाषा व-हाडी आहे· तर कोकणीची लकब "मु·पो· देवाचे गोठणे" मध्ये आढळते· या प्रादेशिक खुणा जशा वेगळेपणाने जाणवितात तशाच त्या त्या भागातील बोली भाषेच्या खुणाही या आत्मकथनातून आपणास परिचित होतात· शरणकुमार लिंबाळे यांच्या "अक्करमाशी" मध्ये महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवरील भाषेचा परिचय होतो· तर "उपरा", "गबाळ", "तराळ-अंतराळ", "आभरान" सातारा-सांगली कडील भाषा त्यामध्ये जाणवते· पुणेरी भाषा "काटयावरची पोटं" व "फांजर" मध्ये प्रत्ययास येते· हे प्रादेशिक विशेष लक्षात घेतले तर म्हणता येते की, प्रादेशिक विशेषांचा परिणाम तेथील माणसावर, त्याच्या वर्तनावर, त्याच्या जीवनावर, त्याच्या व्यवहारावर होत असतो व त्याचे दर्शन आपणास त्या त्या विविध बोलीतून घडत असते·

डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" मधून प्रादेशिक भाषेची व तेथील बोली भाषेची त्याचबरोबर तेथील जाती वैशिष्टय देखील जाणवते· "गबाळ" व "उपरा" मध्ये भटक्यांची भाषा व त्यांची जाती वैशिष्टये आढळतात त्या प्रमाणे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"काटयावरीच पोटं" मध्ये मांगांची भाषा तर "मिटलेली कवाडे" "जटायू" "बलुतं" "फांजर" "हकीकत" मध्ये महारांची भाषा, "मु·पो· देवाचे गोठणे" , "कथा माझ्या जन्माची" मध्ये चांभाराची भाषा लक्ष वेधून घेते· "बेरड व आक्रोश" मध्ये बेरड ≬रामोशी≬ समाजांची भाषा लक्ष वेधून घेते· "बेरड व आक्रोश" या आत्मकथनामध्ये दलित आत्मकथनाची सर्व वैशिष्टये प्रत्ययाला येतात· बेरड समाजाची दरोडे घालण्याची वृत्ती त्या चोरीच्या संदर्भात व्यक्त होणारे त्यांचे धाडस व बेदरकार बेरड वृत्ती आणि पोलीसांच्या अमानुष छळाला समोर जाण्याची त्यांची वृत्ती या आत्मचरित्रात् दिसून येते· पूर्वपार चालत आलेला चोरीचा व्यवसाय आणि चोरीपायी खाल्लेला पोलिसांचा मार, तसेच पोलिसांच्या मारामुळे कितीतरी जणांना आलेला मृत्यू याचे वर्णन वाचकांच्या हृदयाचा ठाव घेते· डॉ·भीमराव गस्तींचा चुलत भाऊ लगम्माण्णास पोलिसांच्या मारा मुळे मरण पावला होता· डॉ· भीमराव गस्तींच्या घशात एकदा मटणाचे हाड अडकले होते तेव्हा मानेवर मारून ते हाड काढून त्यांचा प्राण लगम्माणाने वाचविला· कालेरी शिवाप्पा बेरड समाजातील चोरांचा जणू प्रतिनिधी होता· त्याच्या रक्तामांसात चोरीची मुरलेली प्रवृत्ती डॉ·भीमराव गस्तींनी असे वर्णिले आहे की आपला डोळ्यासमोर एक अट्टल दरोडेखोर उभा रहातो· बेरड समाजातील भौतिक वास्तवाला "बेरड व आक्रोश" मध्ये प्राधान्य दिले असल्यामुळे या ग्रंथाला गद्यमयता आली आहे· देवदासींच्या जीवनाची करूण कहाणी यल्लवाच्या चित्रणातून असे रंगविले आहे की वाचणा-याच्या हृदयाला घरे पडावेत· "बेरड व आक्रोश" या दोन्ही आत्मकथनातून उघड उघड विचार प्रकट केले आहे· डॉ·भीमराव गस्तींचे जीवन व बेरड समाजाचा एकूण जीवन यांचा जणू दस्तऐवज तयार झाला आहे· बेरड समाजाच्या सनातनी चिडखोर पणातून आलेला विपर्यास वगळता त्यातील वस्तूस्थिती तशीच्या तशी आहे हे मान्य करावे लागेल· विशिष्ट जाती जमातीचे अनुकूल व प्रतिकूल वर्तन या आत्मकथनातून मांडले असल्यामुळे काही ठिकाणी तपशीलाचीच पुनःरावृत्ती व पात्र प्रसंगाचा विस्कळीतपणा या आत्मकथनातून जाणवतो· "बेरड व आक्रोश" या आत्मकथनात कारखानदार व मजूर यांच्या समस्या मांडल्या आहेत· देवदासींच्या जीवनाची होणारी परवड चित्रित केली आहे· सग्या सोय-यांच्या संबंधातील कौटुंबिक ताण तणाव वर्णिले आहेत· सामाजिक समस्येच्या आवर्तात सापडलेल्या गस्तींचे भावनिक ताण तणाव व अंतःरिक संघर्ष चित्रित केले

आहे· व मानवी मनाला आव्हान करून विचार प्रवृत्त केले आहे· बेरड समाजामध्ये जागृती निर्माण व्हावी म्हणून त्यांनी पदयात्राही काढली· त्यामुळे बेरड समाज जवळ येवू लागला व आपल्या समस्या सोडविण्यासाठी झगडू लागले व काही ठिकाणी आक्रोशही त्यांना करावा .लागला· याचे विदारक चित्रण करण्यात कमालीचे यश आले आहे·

बालपण व तारूण्याचा कर्तृत्ववान आलेख आपल्या बरोबर आपल्या समाजाला कार्य प्रवृत्त करण्याची लेखकाची जिद्द "बेरड व आक्रोश" मध्ये वाचकालाही अंतर्मुख करते· लेखकाच्या आयुष्याचा पूर्वार्ध व उत्तरार्ध पात्र व प्रसंगाच्या औचित्यपूर्ण मांडणीने साध्या व सोप्या निवेदन शैलीने तसेच सुबोध व स्पष्ट भाषा शैलीने मांडला आहे· या आत्मकथनामध्ये प्रसंगातील नाटय वेधक आहे· व्यक्तिचित्रणात एक प्रकारचा जीवंतपणा पण कारूण्यपूर्णता वाचकाच्या अंतःकरणात कारूण्या निर्माण करणारी आहे· मनाविरूध्द देवदासींच्या जीवनाला बळी पडणा-या स्त्रिया, त्यांच्या समस्या देवदासींच्या व्यक्तिचित्रणातून बोलक्या केल्या आहेत· बेरड समाज, त्यांचे जीवन, त्यांचा चोरीचा व्यवसाय, या समाजातील स्त्रिया, त्यांना भोगावे लागणारे, अमानुष जीवन, भयानक दारिद्रय, सर्व समाजाचे वैचारिक अभिसरण कशा पध्दतीने चालू आहे· याची साक्ष या आत्मकथनातून उत्तम प्रकारे मिळते·

सारांश,

"बेरड व आक्रोश" लिहिणा-या डॉ·भीमराव गस्ती यांच्या समकालिनांनी आत्मकथनाच्या रूपाने आपले जीवन अनुभव कथन करून नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधीत्व चांगल्या प्रकारे केले आहे· त्या त्या आत्मकथनकाराच्या प्रतिभेच्या अवाक्यानुसार या आत्मकथनांची वाङ्मयीन गुणवत्ता कमी अधिक राहिली आहे· तरी आपली व्यक्तिगत दुःखे व समाजाची दुःखे वेशीवर टांगण्याचे फार मोठे कार्य या आत्मकथनांनीकेले आहे· तसेच या समाजाला जागृत करण्याचे महत्वाचे कार्यही केले आहे· या आत्मकथन कारांनी इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी केलेला संवाद अधिक सूचक आहे· भविष्याचे भाकित करताना त्यांनी व्यक्त केलेला आशावाद कोणाच्याही हृदयाला स्पर्श करून जातो· दलित आत्मकथनपर वाङ्मयानी मराठी वाङ्मयात आपले स्वतंत्र स्थान

तर निर्माण केले आहेच. पण त्याच बरोबर आत्मचरित्रात्मक वाड्मयाला एक नवी दिशा दिली आहे. वेगवेगळ्या ग्रंथातून व "अस्मितादर्श" व इतर नियतकालिकातून अनेक दलित लेखकांनी आपले लेखन प्रकाशित केले आहे. त्यामध्ये डॉ. ना.मा.निमगडे, सौ.कांबळे, डॉ.निलकांत चव्हाण, प्रा.वैजनाथ कळसे, आत्मराम कनिराम राठोड यांनीही आपल्या आत्मकथनपर लेखनाने आत्मकथनपर वाड्मयात आपले स्थान निर्माण केले आहे. डॉ.भीमराव गस्तींच्या सारखे नवीन जीवन दृष्टी देणारे दलित लेखक आज समाज मनात परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतर चळवळीप्रमाणे हा त्यांचा समाज परिवर्तन करण्याचा प्रयत्न मानवी विधायक कार्याला सामोरे जाणारा आहे हे मान्य करावे लागेल.